# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री.ईश्वर भागवत सावकारे, वय ४१ वर्ष,व्यवसाय–नोकरी,पद–कृषी पर्यवेक्षक, (उप कृषी अधिकारी),वर्ग–३ तालुका कृषी अधिकारी कार्यालय,मलकापूर ता.मलकापूर जि.बुलढाणा रा.शिरपूर कन्हाळा रोड, कुकरेजा मॉलच्या पुढे,तुकाराम नगर, भुसावळ ता.भुसावळ जि.जळगाव. |
| लाच मागणी | ५०००/– रुपये |
| लाच स्विकारली | तडजोडी अंती ४०००/– रुपये |
| घटना स्थळ | मलकापूर ते बोदवड रोडवरील,पिंपळगावदेवी फाटा,राधास्वामी सत्संगजवळ,मलकापूर |
| घटना तारीख | दि.०९.०२.२०२६ |

थोडक्यात **हकीकत** :– यातील तक्रारदार हे शेतकरी असून त्यांनी कृषी यांत्रीकीकरण उप अभियान योजने अतर्गत कृषी विभागाच्या पूर्व संमतीने मळणीयंत्र खरेदी केले होते. सदर खरेदी केलेल्या मळणीयंत्राच्या अनुदानाची प्रक्रिया पूर्ण केल्याचा मोबादला म्हणून कृषी अधिकारी कार्यालय,मलकापूर येथील कृषी पर्यवेक्षक ईश्वर सावकारे हे ५०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक ०६.०२.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.ईश्वर सावकारे यांनी कृषी विभागाच्या योजने मध्ये खरेदी केलेल्या मळणीयंत्राच्या अनुदानाची प्रक्रिया पूर्ण केल्याचा मोबादला म्हणून ५,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिल्याने आज दि.०९.०२.२०२६ रोजी मलकापूर ते बोदवड रोडवरील, पिंपळगावदेवी फाटा,राधास्वामी सत्संगजवळ येथे सापळा कार्यवाही आयोजीत केली असता तक्रारदार यांचेकडून पंचा समक्ष ४,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे श्री.ईश्वर भागवत सावकारे,कृषी पर्यवेक्षक (उप कृषी अधिकारी) यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरकार्यवाही :–**

१.मा.श्री.बापू बांगर,पोलीसअधिक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९०११३२३४२६

२.मा.श्री.सचिंद्र शिंदे,अप्पर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९७६४२१०४८५

३.मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा.
मों.नं.९५५२५२०१८८

यांचेमार्गदर्शना खाली श्री.रमेश पवार पोलीस निरीक्षक,श्री.विलास गुसिंगे पोलीस निरीक्षक व सापळा पथक पोकॉ.लक्ष्मीकांत इंगळे, गजानन गाल्डे, रंजीत व्यवहारे, शैलेश सोनवणे, चापोहेका नितीन शेटे, सर्व अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.येथे दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व व्हाटस अप क्रमांक ९४०५०९१०६४ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनीकेलेआहे.

( भागोजी चोरमले )
पोलीस उपअधिक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा